# जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा

//जाहीर सूचना//

क्र.जि.नाझर/संनोंक्र 218/1/कावि 78 /2017
दिनांक - 2/2/2017.

जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा येथील निर्लेखित केलेले जुने व निरुपयोगी मॉनीटर,सी.पी.यु, प्रिंटर ए.सी., बॅटरी,यु.पी.एस,फॅक्स मशीन, कुलर, टिव्ही,स्कॅनर,माईक सेट,जनरेटर, झेरॉक्स मशीन, सर्व्हर इ. वस्तुंच्या " जेथे आहे तेथे व जशी आहे तशी " या तत्वावर लिलावाद्वारे विक्रीकरीता दोन लिफाफा पदधतीने निविदा मागवीत आहे.इच्छुक खरेदीदारांना निविदा फॉर्म, निविदा प्रकाशित झाल्याच्या दिनांकापासुन ते दिनांक 09/02/2017 रोजी सांय 5.00 वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयातील, नाझर शाखेमधुन निविदा फॉर्म शुल्क रु.100/- (नापरतावा) रोखीने जमा करुन प्राप्त करता येईल व दिनांक 10/02/2017 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत बंद लिफाप्यामध्ये निविदा सादर करता येईल.प्राप्त झालेल्या निविदा दिनांक 14/02/2017 रोजी सकाळी 11.00 वा. जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा येथे परीषद कक्षामध्ये खुल्या करण्यात येतील. निविदेसंदर्भात अटी व शर्ती निविदा अर्जासोबत सलंग्न केल्या आहेत. निविदेसंदर्भातील निविदा नोटीस प्रसिध्दी सुचना, शुदधीपत्रके इत्यांदीची माहिती http.www.bhandara.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जिल्हाधिकारी भंडाराकरीता

# जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा

अटी व शर्ती :-

1) सदर निविदेसंदर्भातील निविदा नोटीस प्रसिध्दी सुचना, अटी व शर्ती , शुदधीपत्रके इत्यांदीची माहिती www.bhandara.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

1) निविदाधारकाने अमानत रक्कम म्हणुन रु.5000/-(अक्षरी रक्कम रु.पाच हजार फक्त) (प्रत्येक निविदेस) नाझर शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा यांचेकडे रोखीने अथवा निवासी उपजिल्हाधिकारी भंडारा यांचे नावाने डिमांड ड्राप्ट तयार करुन जमा करावी लागेल. सदरची अमानत रक्कम लिलावाची संपुर्ण प्रक्रीया पुर्ण झाल्याशिवाय निविदाधारकास परत मिळणार नाही.

2) अमानत रक्कम जमा केल्याची पावती अथवा डिमांड ड्राप्ट निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.अमानत रक्कम जमा केल्याची पावती किंवा डिमांड ड्राप्ट निविदा अर्जासोबत नसल्यास अशा निविदाधारकास लिलाव प्रक्रीयेमध्ये भाग घेता येणार नाही.

3) ज्यांना रजिस्टर पोस्टाने निविदा पाठवयाची आहे त्यांनी दिनांक 10/02/2017 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत प्राप्त होईल अशा बेताने पाठवावी.निर्धारीत वेळेनंतर प्राप्त होणा-या निविदा स्विकारल्या जाणार नाही.

4) निविदा खुली करतांना निविदा सादरकर्ते किंवा त्यांचे एका प्रतिनिधीला उपस्थितीत राहता येईल. निविदाखुली करतेवळी निविदा सादरकर्ते किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित नसले तरीही निविदा खुली करण्याची प्रक्रीया पार पाडण्यात येईल.

5) " जेथे आहे तेथे व जशी आहे तशी " या तत्वावर सदर जुनी व निरुपयोगी वस्तु / उपकरणांची विक्री करावयाची आहे. निविदाकाराने नमुद केलेल्या ठिकाणी निर्लेखित करावयाची वस्तु / उपकरणे पाहून जास्तीत जास्त दर नमुद करावेत .

6) सदर लिलावाकरीता वस्तु / उपकरणांची हातची किंमत आरक्षित ठेवण्यात आलेली असुन लिलाव प्राप्त जास्तीत जास्त दर आरक्षित किंमत पेक्षा कमी असल्यास सदर लिलाव रद्द करण्यात येईल व सहभागी निविदाधारक यांचे जमाअसलेली अमानत रक्कम परत करण्यात येईल.

7) निविदा सादर करण्यापुर्वी निविदाकाराने वस्तु / उपकरणांची प्रत्यक्ष पाहणी करुन वस्तु / उपकरणांची किंमत नमुद करावी.

8) निविदाधारकाने लिलाव प्रक्रीयेतील अटी व शर्तीचे पालन न झाल्यास पुनश्च निविदा काढण्याचे मा.जिल्हाधिकारी, भंडारा यांना संपुर्ण अधिकार राहील.

9) निविदाकारानी अटी व शर्ती असलेल्या निविदा फॉर्मचे प्रत्येक पानावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. तसेच निविदा दर दर्शविलेल्या पानावर स्वाक्षरी आवश्यक आहे.

10) निविदा सादर करतांना प्रत्येक वस्तु / उपकरणांची लॉट प्रमाणे किंमत एकत्रितपणे नमुद करावी.

11) लिलाव मंजूर केल्यापासून 7 दिवसाचे मुदतीत लिलाव मंजूर केलेली वस्तु / उपकरणांची रक्कम भरुन ताब्यात न घेतल्यास त्या पुढील जास्तीत जास्त 15 दिवस वाढीव मुदतीपर्यंत प्रतिदिनी रुपये 100/- या प्रमाणे दंडाची रक्कम भरावी लागेल.

12) यशस्वी निविदाधारकास निविदा स्विकृत झाल्याचे दिनांकापासुन 7 दिवसाचे आत रक्कम चालानद्वारे सबंधीत लेखाशीर्षावर जमा करणे बंधनकारक राहील.अन्यथा त्यांची निविदा रद्य ठरविण्यात येऊन अमानत रक्कम जप्त करण्यात येईल.

13) निविदाधारकास निविदा फॉर्ममधील संपुर्ण तपशिल भरुन त्यावर स्वाक्षरी करणे आवश्यक राहील.अपुर्ण निविदा विचारात घेतली जाणार नाहीत.

14) वरील प्रमाणे सदर वाढीव मुदतीत देखील सबंधिताने खरेदी केलेली वस्तु / उपकरणे न उचलल्यास त्या निविदाधारकाची अमानत रक्कम जप्त केली जाईल त्यासाठी स्वतंत्र पत्रव्यहार केला जाणार नाही. त्यानंतर संबंधित लिलावधारकाचे कोणतेही म्हणणे विचारात घेतले जाणार नाही.

15) लिलावानुसार विकलेली वस्तु / उपकरणे कार्यालयीन कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत संबंधीत लिलाव मंजुर केलेल्या अधिकृत निविदा धारकाच्या ताब्यात देण्यात येतील.

16) लिलाव मंजूरीचा आदेश प्राप्त झालेल्या दिनांकापासून सदर वस्तु / उपकरणांची जबाबदारी संबंधीत लिलावधारकाची राहील त्यात काही कमी जास्त झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा जबाबदार राहणार नाही.

17) उपरोक्त अटी व शर्ती शिथिलक्षम करण्याचा व कोणतीही अथवा सर्व निविदा स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अंतिम अधिकार मा. जिल्हाधिकारी यांचा राखून ठेवण्यात येत आहे.

18) निविदा प्रपत्रातील सर्व अटी व शर्ती निविदाधारकास बंधनकारक राहतील. तसेच प्राप्त निविदांपैकी कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचा अधिकार जिल्हाधिकारी भंडारा यांनी राखुन ठेवला असून निविदा भरणा-या कोणत्याही खरेदीदाराला निविदा फेटाळल्याबद्यल स्पष्टीकरण मागता येणार नाही.

19) एकदा एखादया  वस्तुंचे / उपकरणांचे दर मान्य झाल्यास कोणत्याही परिस्थितीत निविदाकाराला आपली निविदा मागे घेता येणार नाही तसे केल्यास निविदाकाराची अनामत रक्कम जप्त करुन शासन जमा करण्यात येईल.

20) निविदा धारक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी निविदा उघडण्याच्या वेळी हजर राहुन शकतील तथापि निविदा उघडतांना निविदाधारक हजर असणे बंधनकारक राहणार नाही.

21) निविदाधारकाने लिफाफे सादर करतांना त्यावर लिफाफा क्रमांक नमुद करावा व लिफाप्यावर आपले नाव नमुद करावे व लिफाफा क्र.1 वर तांत्रिक लिफाफा व लिफाफा क्र.2 वर व्यापारी लिफाफा असे स्पष्टपणे नमुद करावे व दोन्ही लिफाप्यावर **"जुने निर्लेखन साहीत्य सामुग्री लिलाव प्रक्रीयेसाठी अर्ज"** असा स्पष्ट उल्लेख करावा.

22) लिफाफा क्र.1 (तांत्रिक लिफाफा) शक्यतो दिनांक 14/02/2017 रोजी  सकाळी 11.00 वा जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा येथे उघडण्यात येईल.पात्र निविदा धारकांकडुन दराचा लिफाफा क्र.2 (व्यापारी लिफाफा) शक्यातोवर त्याच दिवशी कार्यालयीन  वेळेमध्ये सोयीनुसार उघडण्यात येईल. उपस्थित निविदाधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांना लिफाफा क्र.2 उघणेबाबत वेळेवर सुचना दिली जाईल.

23) निविदा प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा निविदा.मंजुरीनंतर कोणत्याही टप्प्यांवर कागदपत्राच्या विधी ग्राहयतेबाबत आक्षेप नोंदविला गेल्यास सदरची बाब कायदेशीर / फौजदारी कार्यवाहीस पात्र राहील.

24) निविदे सबंधाने कोणत्याही प्रकारचे निर्माण होणारे वाद-विवाद इ.सबंधाने जिल्हाधिकारी भंडारा यांचे निर्णय अंतिम राहील व तो निविदाधारकास मान्य करावा लागेल.

25) निविदा धारकास अटी व शर्ती मान्य असल्याचे बाबतचे व काळया यादीमध्ये नसल्याबाबतचे हमीपत्र  तयार करुन सादर करावे लागेल.

*** निविदा भरण्याची कार्यपदधती :-**

**पाकिट क्र.1]  तांत्रिक लिफाफा (Technical Bid)**

1. निविदा फार्म क्र.1 सोबत निवासी उपजिल्हाधिकारी भंडारा यांचे नावाने रुपये 5000/- (परतावा) डिमांड ड्राप्ट किंवा रोखीने अमानत रक्कम जमा केल्यास रु.5000/- जमा केल्याची पावती जोडणे अनिवार्य राहील . सदरची रक्कम परत करतांना या रकमेवर कोणतेही  प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.
2. निविदा फार्म क्र.1 सादर करतांना  त्यासोबत फॉर्म फी रू.100/- (नापरतावा) जमा केल्याची पावती ,निविदाधारकांस बयाणा रक्कम भरण्यापासून सुट असेल तर  तसे सुटीचे प्रमाणपत्र ,विहीत नमुन्यातील निविदेतील अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे बंधपत्र / हमीपत्र  ,प्राप्तीकर पॅनकार्ड , . रहीवाशी पुरावा इ. आवश्यक दस्तऐवज निविदा फॉर्म क्र.१ सोबत जोडणे अनिवार्य राहील. यापैकी एखादेही कागदपत्र निविदा फॉर्म क्र.१ सोबत जोडलेले नसल्यास सदर निविदाधारकांची निविदा अवैध करणेत येईल व त्याचा व्यापारी लिफाफा (लिफाफा क्र.2) उघडण्यात येणार नाही.तसेच कोणतेही कागदपत्रे जोडण्याची वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.

***पाकिट क्र.2]  व्यापारी लिफाफा :**

1. निविदेतील दरामध्ये विक्रीकर, जकात, वाहतुक खर्च , चढ-उतार खर्च तसेच इतर  लागू सर्व कर इत्यादी बाबीचा विचार करुनच निविदेमध्ये दर नमुद करावेत.
2. निविदा धारकाने दिलेल्या बाबनिहाय दरानुसार जास्तीत-जास्त दराच्या किंमतीवर तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन सर्वाधिक  किंमत असलेल्या निविदाधारकाच्या किंमतीवर लिलाव करण्यात येईल.

जिल्हाधिकारी भंडाराकरीता

४